# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :-  सुरेश कुळकर्णी

---

संगीत हीच संजीवनी
संगीत हाची उपचार
संगीत जीवनदायिनी

संगीत करी नियंत्रित रक्तदाब
शमवी चिंता हरवी ताण मनाचा
ऐकता, म्हणता, वाजविता संगीत
मन होऊनी जाई प्रसन्न उल्हसित

संगीत देई शांती मना
वाढवी स्मरणशक्ती
मानसिक सतर्कता
वाढवी बौद्धिक गुणवत्ता

जीवनाचा मूलाआधार
संगीताचे सुरेल स्वर
लय ताल आणि सूर
करीती या देहाचे देवालय

लय ताला चे देवालय हे
देह हा रसिक हृदय मंदिर
रंगवा सुरांनी मंदिर

लय ताल अन सूर मिळवा
एकचित्त होऊनी घोळवा
हळूच काढा गोड गळ्यातून
सुरेलशी लकीर
रंगवा सुरांनी मंदिर

Anahat Music Therapy

‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

समयोचित तो राग घ्यावा
थाट आठवा जात आठवा
वादी संवादी सुर जुळवा
वर्ज्य वगळुनी कोमल खुलवा
सांगा हलके गूज कवीचे
तोषवा रसिक हृदयमंदिर
रंगवा सुरांनी मंदिर

मंद्र मध्य तार सप्तक
मधुनच घ्या हो छान गमक
स्थायी आधी मग अंतरा
फुलवित जाहो राग सुरवरा
सूर मधुर मदीर
रंगवा सुरांनी मंदिर

Anahat Music Therapy